आकाशवाणी मुंबई

प्रादेशिक बातमीपत्र - दुपारी ३.०० वाजता

१६ जुलै २०२४ - मंगळवार

देशाची वस्तू आणि सेवा निर्यात जून महिन्यात ५ पूर्णांक ४ दशांश टक्क्यांनी वाढून ६५ अब्ज ४७ कोटी डॉलरवर पोहोचली आहे. वाणिज्य आणि उद्योग मंत्रालयाने जाहीर केलेल्या आकडेवारीत ही माहिती देण्यात आली. चालू आर्थिक वर्षाच्या एप्रिल ते जून या तिमाहीत निर्यात ८ पूर्णांक ६ दशांश टक्क्यांनी वाढून २०० अब्ज ३३ कोटी डॉलरवर पोहोचली आहे. अभियांत्रिकी सामग्री, इलेक्ट्रॉनिक वस्तू, औषधं, कॉफी या वस्तूंची निर्यात वाढल्यामुळे देशाच्या निर्यातीत वाढ झाल्याचं वाणिज्य आणि उद्योग मंत्रालयाने म्हटलं आहे.

<><><><><>

गुन्ह्याचा तपास करताना साक्षीदारांची चौकशी करण्यासाठी पोलीस ठाण्यातली किंवा पोलीस विभागाच्या अखत्यारीतली जागा निवडू नये असं केंद्र सरकारने सर्व राज्ये आणि केंद्रशासित प्रदेशांना सांगितलं आहे. केंद्रीय गृहमंत्रालयाचे सचिव अजय भल्ला यांनी या संदर्भात सर्व राज्य आणि केंद्रशासित प्रदेशांच्या मुख्य सचिवांना पत्र लिहलं आहे. पोलीस ठाण्यांनी साक्षीदाराची चौकशी ऑडिओ, व्हिडीओ इलेक्ट्रॉनिक साधनांच्या माध्यमातून करण्यासाठी विशिष्ट जागा ठरवून घ्यावी, असं सरकारनं सांगितलं आहे.

<><><><><>

जम्मू-काश्मीरच्या डोडा जिल्ह्यात काल रात्री दहशतवाद्यांशी झालेल्या चकमकीत गंभीर जखमी झालेल्या पाच सुरक्षादल जवानांचा आज मृत्यू झाला. यात लष्कराच्या एका अधिकाऱ्याचाही समावेश आहे. संरक्षणमंत्री राजनाथ सिंह यांनी याबद्दल दुःख व्यक्त केलं आहे. प्राणांची आहुती देणाऱ्या या जवानांच्या कुटुंबीयांसोबत देश खंबीरपणे उभा आहे, असं त्यांनी म्हटलं आहे. लष्करप्रमुख जनरल उपेंद्र द्विवेदी यांनीही या हुतात्म्यांना आदरांजली वाहिली आहे.

**<><><><>**

आषाढी एकादशी उद्या साजरी होत आहे. त्या पार्श्वभूमीवर मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आज पंढरपूर दौऱ्यावर असून, त्यांच्या हस्ते आज उत्तररात्री अडीच वाजेच्या सुमारास श्री विठ्ठल रुक्मिणीची शासकीय महापूजा केली जाणार आहे.

यानिमित्त पंढरपूर इथं येणाऱ्या वारकऱ्यांना आवश्यक त्या सर्व सुविधा आणि व्यवस्था उपलब्ध करून देण्यासाठी सोलापूरचे पालकमंत्री चंद्रकांत पाटील यांच्या अध्यक्षतेखाली “समन्वय समिती” गठीत करण्यात आली आहे. ग्रामविकास आणि पंचायतराज मंत्री गिरीश महाजन तसंच सार्वजनिक आरोग्य आणि कुटूंब कल्याण मंत्री तानाजी सावंत या समितीत सदस्य म्हणून काम पाहणार आहेत.

**<><><><>**

आषाढी एकादशीनिमित्त नांदेड जिल्ह्यातल्या ९ आगारातून २३० बस सोडण्यात येणार आहेत. या बसमध्ये महिलांना अर्धे तिकीट, ज्येष्ठ नागरिकांना मोफत प्रवास या सवलती दिल्या जाणार आहेत.

**<><><><>**

प्रधानमंत्री पीक विमा योजनेअंतर्गत एक रुपयात पीक विमा भरण्याची मुदत येत्या ३१ जुलैपर्यंत वाढवण्यात आली आहे. या योजनेची अंतिम मुदत कालपर्यंत म्हणजे १५ जुलैपर्यंत होती. मात्र, राज्यातल्या अनेक शेतकऱ्यांनी अजूनही पीक विमा भरलेला नाही; त्यामुळे पीक विमा भरण्यासाठी मुदतवाढ देण्याची मागणी कृषी मंत्री धनंजय मुंडे यांनी केंद्र सरकारकडे केली होती. त्यांच्या मागणीनंतर ही मुदत ३१ जुलैपर्यंत वाढवण्यात आली आहे.

**<><><><>**

मुंबई-पुणे महामार्गावर काल रात्री एका बस अपघातात ५ जणांचा मृत्यू झाला असून ८ जण गंभीर जखमी झाले आहेत. आषाढी एकादशीनिमित्त डोंबिवलीहून पंढरपूरला जाणारी बस ट्रॅक्टरला धडकून दरीत कोसळली. या बसमधून ५४ प्रवासी प्रवास करीत होते. या अपघातात ट्रॅक्टर चालकाचा जागीच मृत्यू झाला. जखमींना पनवेलच्या खाजगी रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आलं असल्याची माहिती पोलिसांनी दिली आहे.

<><><><><>

अमरावती जिल्ह्यातल्या पुर्णा पाणलोट क्षेत्रात होत असलेल्या संततधार पावसामुळे जलाशयाची पातळी ४४८ पूर्णांक ५३ मिलीमीटर झाली आहे. पुढील ३ ते ४ तासांत जलाशयातून पाण्याचा विसर्ग केला जाणार आहे. त्यामुळे नदीकाठच्या गावांना सतर्कतेचा इशारा देण्यात आला आहे.

<><><><><>

मुंबईच्या उपनगरीय रेल्वे स्थानकांवरचे सरकते जिने आणि उद्वाहनांच्या देखभालीसाठी पश्चिम रेल्वेनं संकेतस्थळ आधारीत केंद्रीकृत देखरेख प्रणाली विकसित केली आहे. पश्चिम रेल्वेच्या काल प्रसिद्ध झालेल्या पत्रकात ही माहिती दिली आहे.

<><><><><>

स्विडीश ओपन टेनिस स्पर्धेत पुरुष एकेरीत आज भारताच्या सुमित नागल याचा सामना स्विडनच्या एलियस यमेर याच्याशी होणार आहे. तर पुरुष दुहेरीत सुमित नागल आणि त्याचा जोडीदार कॅरोल ड्रझविकी यांची लढत फ्रान्सच्या अलेक्झांडर म्युलर आणि लुका वॅन या जोडीशी आज संध्याकाळी होईल.

<><><><><>

प्रसिद्ध उद्योजक सुभाष  दांडेकर यांचं काल मुंबईत निधन झालं. ते ८६ वर्षांचे होते. चित्रकलेसाठीच्या साहित्य निर्मितीत अग्रेसर कंपनी कॅम्लिन फाईन सायन्सेस चे ते संस्थापक आणि कोकुयो कॅम्लिन चे मानद अध्यक्ष होते. दांडेकर यांच्या मृत्यूने रंगांचा जादूगार हरपल्याची भावना व्यक्त होत आहे. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, यांच्यासह अनेक मान्यवरांनी दांडेकर यांच्या निधनाबद्दल दुःख व्यक्त केलं असून आदरांजली वाहिली आहे.

//<><><><><>//